# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 26/03/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

---

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

प्रति,

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

जावक क्रमांक :- पोअय/आलि-80 सी/पदोन्नती/पोना-पोहवा/ 3174/2020
पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ
दूरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
यवतमाळ, दिनांक :- 26 MAR 2020

## आ दे श

या कार्यालयाचे आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस नाईक यांना पोलीस हवालदार या पदावर वेतन संरचना 26400-83600 विशेष वेतन 450/- मध्ये जेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातुन खालील नमुद अटिंचे अधिन राहुन निवळ तात्पुरत्या स्वरुपात दिनांक 24/03/2020 पासुन पदोन्नती देण्यात येत आहे. पदोन्नती नंतर ते सद्या ज्या ठिकाणी कार्यरत आहेत त्याच ठिकाणी कार्यरत राहतील.

सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपात, सेवाजेष्ठतेनुसार खुला प्रवर्गातील रिक्त पदावर असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या आधिन राहुन देण्यात येत आहे.

| अ.क्र | बंन | पदनाम | पोलीस कर्मचारी यांचे नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग | नेमणुक |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 110 | पोलीस नाईक | हरिभाऊ ठाकरे | खुला जेष्ठतेनुसार | वडगांव जंगल |

तसेच सदरहु आदेश हे शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-2017/प्र.क्र312A/16 व, दिनांक 18/10/2017 व दिनांक 29/12/2017 मध्ये नमुद केल्यानुसार मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी याचीका क्रमांक 2797/2015 मध्ये दिनांक 04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयानुसार राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका डायरी क्रमांक 33151/2017 दाखल केलेली आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती कालावधीत, राज्य शासनाच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका डायरी क्रमांक 33151/2017 तसेच विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक 28306/2017वर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन, शासन निर्णय सा.प्र.वि.क्र बीसीसी-2001/1887/प्र.क्र.64/01/16-ब दिनांक 25/05/2004 मधील तरतुदीनुसार पदोन्नतीमध्ये आरक्षण न देता तुर्तास शासन पत्र साप्रवि दिनांक 29/12/2017 प्रमाणे पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार भरण्यात येत आहे.

सदर पदोन्नती हि संपुर्णतः तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या आधिन राहुन देण्यात येत असल्याने न्यायनिर्णय व शासनाचे आदेशानुसार दिलेली पदोन्नती कोणत्याही वेळी रद्द करुन मुळ पदावर पदावनत करण्यात येईल.

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बाशिअ-1214/प्र.क्र 26/11 दिनांक 02/06/2014 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार सन 2019-2020 च्या वित्तीय वर्षाची माहे मार्च 2020 अखेर पर्यंतची मत्ता व दायित्वची विवरणपत्रे अद्यापही सादर केले नसल्याने त्यांनी तात्काळ मत्ता व दायित्वाची विवरणपत्रे सादर करण्यात यावी. आणि ती त्यांची स्वतःची जबाबदारी राहील जे कर्मचारी मत्ता व दायित्वची विवरणपत्रे या कार्यालयास सादर करणार नाही त्यांची पदोन्नती या कारणास्तव कोणत्याही वेळी रद्द करण्यात यईल याची संबधीतांनी नोंद घ्यावी.

वर नमुद पोलीस कर्मचारी यांना आता निलंबित केले असेल किंवा त्यांच्या विरुध्द नव्याने गंभीर कसुरी बाबत विभागीय चौकशी प्रलंबित असेल किंवा न्यायालयात खटला चालु असेल किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील प्रलंबित असेल किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील तर असे निदर्शनास आल्यास त्यांना पदोन्नती न देता तात्काळ या कार्यालयास कळविण्यात यावे.

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीचवाय 1082/सी आर/1100 (2)/एसईआर-3 दिनांक 06/11/1984 अन्वये पदोन्नतीनंतरच्या पदावर वेतन निश्चिती करण्याबाबत विकल्प दयावयाचा असेल तो पदोन्नती दिल्याचे दिनांकापासुन 01 महिण्याच्या आत या कार्यालयास सादर करावा. वेतन निश्चिती करीता दयावयाचा विकल्प 01 महिणेचे आत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास पदोन्नती पदावरील वेतन निश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम 1981 मधिल नियम 11(1)(ए) आणि शासन अधिसुचना, वित्त विभाग क्रमांक वेपुर 1209/प्र.क्र. 27/सेवा-9 दिनांक 22/04/2009 मधील नियम 13 (ब) (2) अन्वये पदोन्नतीचा दिनांक विचारात घेवुन करण्यात येईल.

वर नमुद पोलीस कर्मचारी यांना कळविण्यात येते की महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही/2015/प्र.क्र 303/का.12 दिनांक 12/09/2016 अन्वये जे कर्मचारी सदरची पदोन्नती नाकारणार आहेत अशा कर्मचाऱ्यांना दोन वर्षा पर्यंत त्यांना त्यांचे पदोन्नती करिता विचार करण्यात येणार नाही.

ज्या पोलीस कर्मचारी यांना पदोन्नती नाकारावयाची असेल त्यांनी 07 दिवसांचे आत प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने अर्ज या कार्यालयास सादर करावा.

" <u>पदोन्नती झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे पदोन्नती झाल्याबद्दल आमचे तर्फे अभिनंदन करण्यात येत आहे</u> "

(एम.राज कुमार)
पोलीस अधीक्षक यवतमाळ

प्रति,

ठाणेदार पो.स्टे वडगांव जंगल

02/ संबधित ठाणेदार/शाखा प्रमुख यांनी सदर पदोन्नतीचे आदेश सर्व पोलीस कर्मचारी यांचे समोर गणनेवर वाचुन दाखवावे तसेच ज्या पोलीस कर्मचाऱ्यांने पदोन्नती स्विकारलेली आहे त्या बाबतची नोंद हुद्दावार नोंदवही मध्ये घेवुन त्या बाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत :- अपर पोलीस अधिक्षक यवतमाळ/पोलीस उपअधिक्षक (मुख्या)/कार्यालय अधिक्षक/प्रमुख लिपीक लेखा शाखा पत्रव्यवहार शाखा, वि.चौ शाखा, प्रवंधक शाखा/सहा.आस्थापना लिपीक 1/वेतन लिपीक-1/राजपत्रे लिपीक/ विभागीय चौकशी लिपीक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहिस्तव

# भाग २ - रजा

# भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

# भाग ४ - बक्षिस / मानधन

# भाग ५ - शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

# भाग ६ - प्रशिक्षण व इतर

निरंक